# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २४.०३.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (१४.०३.२०२६ ते २०.०३.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२५.०३.२०२६ ते २९.०३.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | दिनांक | २५ | २६ | २७ | २८ | २९ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ५ | ० | ० |
| ३५.६ | ३६.० | ३३.५ | ३४.५ | ३४.० | ३५.० | ३५.५ | कमाल तापमान (अं.से.) | ३७ | ३८ | ३७ | ३७ | ३६ |
| १८.६ | १९.२ | १७.६ | १७.२ | १८.४ | १८.० | १७.८ | किमान तापमान (अं.से.) | २२ | २२ | २२ | २१ | २० |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | स. ढग स्थिती (आकाश) | २ | २ | ३ | २ | १ |
| ५ | ६ | ४ | ० | ० | ० | ० | दु. | | | | | |
| ७६ | ७३ | ७२ | ७० | ७१ | ७५ | ७८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६९ | ६५ | ६६ | ७१ | ७६ |
| २८ | ४५ | ४५ | ३४ | ३५ | ३८ | ४२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३७ | ३५ | ३६ | ३५ | ३४ |
| २.४ | २.९ | ३.० | २.४ | १.७ | २.४ | ३.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ४ | ४ | ५ | ६ |
| द.आ. | ई. | ई. | प. | ई. | ई. | प. | स. वाऱ्याची दिशा | वा. | वा. | उ. | उ.ई. | प. |
| ई. | नै. | वा. | ई. | उ.ई. | वा. | ई. | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ३.२ | ३.२ | १ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २५ ते २९ मार्च दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २७ मार्च रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २७ मार्च पर्यंत कमाल तापमान ३६.० ते ३८.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २०.० ते २२.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ६५ ते ७६%, दुपारची सापेक्ष आद्रता ३४ ते ३७% तसेच वाऱ्याचा वेग ताशी ३ ते ६ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २९ मार्च ते ४ एप्रिल दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **हवामान इशारा** | | **कोल्हापूर जिल्ह्यामध्ये तसेच जिल्ह्यातील घाट भागामध्ये दिनांक २६ मार्च रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | ➢ कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २६ व २७ मार्च रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या पिकाची (गहू, ज्वारी, मका, व कांदा) काढणी व मळणी करावी व तयार शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा.<br>➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबाईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड ॲप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>➢ शेतकरी बांधवांनी किटकनाशकाची तसेच बुरशीनाशकाची फवारणी पावसाची उघडीप पाहून व वारा शांत असताना करावी |
| संदेश | | ➢ २६ व २७ मार्च रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी |
| मका | काढणी व साठवणूक | ➢ धान्यासाठी मका पिकाची काढणी कणसावरील आवरण पिवळसर पांढरे आणि टणक झाल्यावर करावी. त्यासाठी ताटे न कापता प्रथम कणसे सोलून खुडून घ्यावीत आणि सोललेली कणसे २ ते ३ दिवस उन्हात चांगली वाळवावीत. त्यानंतर मका सोलणी यंत्राच्या सहाय्याने सोलणी करावी व नंतर दाण्यातील ओलावा १०-१२ टक्के होईपर्यंत दाणे उन्हात चांगले वाळवावे जेणेकरुन साठवणुकीत किडींचा प्रादुर्भाव होणार नाही. |
| रब्बी ज्वारी | दाणे भरणे ते पक्वता | ➢ दिनांक २६ व २७ मार्च रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या व उशिरा पेरणी केलेल्या ज्वारी पिकाची काढणी व मळणी करावी व तयार शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| गहू | पक्वता | ➢ दिनांक २६ व २७ मार्च रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या व उशिरा पेरणी केलेल्या गहू पिकाची काढणी व मळणी करावी व तयार शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| हरभरा | पक्वता | ➢ पक्व झालेल्या हरभरा पिकाची काढणी व मळणी करावी. पावसाची शक्यता असल्याने मळणी करून तयार झालेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा |
| ऊस | वाढीची | ➢ मार्चमध्ये ऊस पिकास प्रती दिवस ६.०६ लिटर पाण्याची गरज असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४लिटरचा ड्रीपर) दररोज १ तास आणि ३१ मिनिटे चालू ठेवावा. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| टोमॅटो | वाढीची | ➢ टोमॅटो पिकावर पांढरी माशी व फुलकिड्यांच्या प्रादुर्भाव दिसून येत आहे नियंत्रणासाठी कोरडे हवामान असताना इमिडाक्लोप्रीड ०.५ मि.लि. प्रती लिटर पाण्यातून फवारावे.<br>➢ दिनांक २६ व २७ मार्च रोजी तुरळक ठिकाणी जोरदार वाऱ्यासाह हलक्या पावसाची शक्यता असल्याने टोमॅटो झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून टोमॅटो रोपांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| आंबा | फळ वाढीची | ➢ पिकामधील फळ गळ कमी करण्यासाठी उपलब्धतेनुसार प्रत्येक झाडास १०० लिटर पाणी प्रती आठवडा आंबा फळे वाटाण्याच्या ते सुपारीच्या आकाराच्या दरम्यान असताना द्यावे. आंबा फळबागेत जमिनीमध्ये ओलावा टिकविण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा.<br>➢ साधारणतः अंड्याच्या आकाराच्या फळांना फळ माशीचा प्रादुर्भाव होऊ शकतो. फळगळ झालेली असल्यास पडलेली फळे गोळा करून नष्ट करावीत व रक्षक फळ माशी सापळे @ २ प्रती एकर या प्रमाणात लावावेत. |
| कांदा | पक्वता | ➢ पक्व झालेल्या कांदा पिकाची काढणी करावी व काढलेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| केळी | घड विकसित होणे | ➢ जोरदार वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असल्याने केळी झाडे उन्मळून पडू नये म्हणून केळी झाडांना काठीच्या किंवा बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा |
| पशुधन | वाढीची | ➢ लाळ खुरकुत रोगापासून बचावासाठी निरोगी जनावरांना लाळ खुरकुत रोगाची रोगप्रतिबंधक लस मार्च महिन्यामध्ये अधिकृत पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने टोचून घ्यावी. ३ महिन्याच्या आतील तसेच गाभण जनावरांना लस देणे टाळावे.<br>**जनावरांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पुढील उपाय करावेत...**<br>➢ म्हशींना घर्मग्रंथी खूप कमी असल्याने व त्यांची त्वचा काळी असल्याने वाढणाऱ्या तापमानाचा गायींपेक्षा म्हशींना त्रास जास्त होतो म्हणून म्हशींना पाण्यात डुंबन्यास सोडावे.<br>➢ जनावरे सावलीच्या ठिकाणी बांधावीत. शक्य असल्यास दिवसातून ४ ते ५ वेळा त्याच्या अंगावर पाणी फवारावे.<br>➢ जनावरांना पुरेशे, शुद्ध व थंड पाणी पिण्यास द्यावे. जनावरांना पुरेसा प्रथिनेयुक्त व हिरवा चारा आणि खनिजमिश्रण द्यावे.<br>➢ दुपारच्या वेळेस जनावरे चारावयास नेऊ नयेत. |
| पोल्ट्री पक्षी | वाढीची | पोल्ट्रीमधील पक्षांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पोल्ट्रीच्या बाजूने बारदाणे लावावेत व त्यावर वारंवार पाणी शिंपडावे जेणेकरून आतील तापमान कमी राहण्यास मदत होईल.तसेच पोल्ट्रीमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी . |

| मेघदूत | दामिनी |
|---|---|
| ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

**ठिकाण** : कोल्हापूर

**दि.** : २४.०३.२०२६

स्वाक्षरीत

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**